| | |
|---|---|
| MHSI04000602-2025 | दाखल तारीख : ०४.०८.२०२५<br>नोंदणी तारीख : ०४.०८.२०२५<br>निकाल तारीख : १८.०६.२०२६<br>कालावधी : वर्षे महिने दिवस<br>०० १० १४ |

**कुडाळ येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी – एन.ए.बकरे)

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.६१/२०२५** **निशाणी क्र.८**

१. सिध्दाली सिध्दार्थ नेरुरकर, }
पु.श्र. कांचन वसंत गावकर, } **...अर्जदार**
वयः– २७ वर्षे, व्यवसायः– काही नाही, }
रा. मांडकुली, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग. }

**विरुध्द**

१. सिध्दार्थ बापू नेरुरकर, }
वयः– ३३ वर्षे, व्यवसायः– रिक्षा चालक, } **... सामनेवाला**
रा. नेरुर, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग. }

---

**अर्जः–** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १४४ अंतर्गत.

---

---

**अर्जदारातर्फे वकील :–** ॲड. श्री. आर.डी.बिले

**सामनेवालातर्फे वकील :–** एकतर्फा

---

–::–**न्यायनिर्णय**–::–

**( घोषित दिनांक :१८.०६.२०२६ )**

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार हिने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १४४ अन्वये दाखल केला असून, त्यामध्ये सामनेवाला याचेकडून दरमहा रक्कम रुपये १०,०००/– प्रमाणे पोटगी स्वरुपात रक्कम मिळावी. तसेच प्रस्तुत अर्जाचा खर्च रक्कम रुपये ५,०००/– सामनेवाला याचेकडून मिळावा ही विनंती केलेली आहे.

**अर्जदार हिचे थोडक्यात कथन असे की–**

**२.** अर्जदार व सामनेवाला हे नात्याने पती–पत्नी असून, त्यांचा विवाह हिंदू धर्माप्रमाणे दि.१४.०७.२०१४ रोजी आशिर्वाद मंगल कार्यालय सावंतवाडी येथे झाला. विवाहानंतर अर्जदार ही सामनेवाला यांचे घरी म्हणजेच गांव मौजे नेरुर, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथे नांदण्यासाठी आली. अर्जदार हिला सामनेवाला याचेपासून दि.१९.११.२०१८ रोजी एक मुलगी झाली. मुलगीचे नाव सान्वी ठेवण्यात आले. ती सध्या इयत्ता दुसरीमध्ये असून, सामनेवाला याचेसोबत राहत आहे.

**३.** अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, लग्नानंतर ४ वर्षे चांगली गेली. परंतु, सामनेवाला याचा स्वभाव विक्षिप्त होता व त्याला दारुचे व्यसन होते. सामनेवाला हा दारु पिऊन घरी येत असे व अर्जदार हिला मारझोड करत असे. सामनेवाला याच्या दारु पिण्याच्या सवयीमुळे घरामध्ये सतत वाद होत होते. सामनेवाला हा नेहमी अर्जदार हिला काहीही किंमत न देता तिला टोचून बोलून तिचा शारीरिक व मानसिक छळ करत होता. सामनेवाला याचा स्वभाव हा संशयी स्वरुपाचा होता. अर्जदार ही कोणाबरोबरही बोलली तरी सामनेवाला हा तिचेवर संशय घेऊन तिला मारझोड करुन छळत होता. "तुझी काहीतरी भानगड आहे. तु कोणासोबत तरी झोपतेस." असे बोलून सामनेवाला हा अर्जदार हिला मारहाण करत होता.

४. अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, सामनेवाला हा आज ना उद्या सुधारेल या आशेने अर्जदार हिने तिला होणाऱ्या त्रासाबाबत माहेरी सांगितले नव्हते. विवाहानंतर सामनेवाला याने सन २०१८ मध्ये कर्ज घेतले होते. सदर कर्जाचे हप्ते सामनेवाला हा भरत नसल्याने सदर कर्जाच्या हप्त्यांची जबाबदारी जबरदस्तीने सामनेवाला याने अर्जदार हिचेवर टाकली होती. सामनेवाला हा अर्जदार कामावर जात असताना तिच्या मागे-मागे जात होता व इतर लोकांच्या समोर तिला शिवीगाळ करुन, अपमान करुन छळ देखील करत असे. सामनेवाला याने अर्जदार हिला कधीही प्रेमाने वागवले नाही. तसेच अर्जदार आजारी असल्यास तिला सामनेवाला हा कधीही डॉक्टरांकडे घेऊन गेला नाही. तसेच सामनेवाला हा अर्जदार हिला तिच्या माहेरच्या लोकांवरुन टोचून बोलून तिच्या आई-वडिलांना शिवीगाळ करत असे.

५. अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, सामनेवाला याने अर्जदार हिचे मोठ्या प्रमाणात मानसिक व शारीरिक खच्चीकरण केले असल्यामुळे अर्जदार पुर्णपणे खचून गेली आहे. त्यामुळे तिला सामनेवाला याचेसोबत राहणे आणि संसार करणे अशक्य बनले आहे. दि.२२.०३.२०२४ रोजी सामनेवाला हा दारु पिऊन घरी आला व अर्जदार हिचेकडे पैशाची मागणी करु लागला. तेव्हा अर्जदार हिने पैसे देण्यास नकार दिल्याने सामनेवाला याने अर्जदार हिला शिवीगाळ करुन, मारझोड करुन, मोठमोठ्याने भांडण केले व अर्जदार हिला घरातून बाहेर काढले. तेव्हापासून अर्जदार ही माहेरी तिच्या आईजवळ राहते. सामनेवाला हा धडधाकट पुरुष असून, त्याची स्वतःची रिक्षा आहे. त्यापासून त्याला दरमहा ४०,०००/- रुपये एवढे उत्पन्न मिळते. परंतु, आतापर्यंत सामनेवाला याने अर्जदार हिची कोणत्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. तसेच अर्जदार हिची कोणतीही पोटगीची व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे अर्जदार हिने सामनेवाला यांचेकडून दरमहा रक्कम रुपये १०,०००/- (दहा हजार रुपये मात्र) पोटगी स्वरुपात तसेच सदर अर्जाचा खर्च रक्कम

रुपये ५,०००/–(पाच हजार रुपये मात्र) मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

६. प्रस्तुतकामी सामनेवाला यास पुरेशी संधी देऊनही सामनेवाला याकामी हजर झाले नसल्यामुळे त्यांचेविरुध्द माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दि.३०.०३.२०२६ रोजी सदरचा अर्ज सामनेवालाविरुध्द एकतर्फा चालविणेचा आदेश निशाणी क्र.१ वर पारीत केला आहे.

७. अर्जदार यांचे कथन, अभिलेखावरील दाखल कागदपत्रे यावरुन खालील मुद्दे उपस्थित झाले असुन, त्यावरील निष्कर्ष मी खालील कारणांसहित देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | सामनेवाला यांनी अर्जदार हिचे पालन–पोषण करण्यास नकार दिला व दुर्लक्ष केले आहे काय ? | **होय.** |
| २. | अर्जदार स्वतःचा उदरनिर्वाह करणेस असमर्थ आहे काय ? | **होय.** |
| ३. | सामनेवाला याचे अर्जदार हिला पोटगी देणेकरीता पुरेसे उत्पन्न आहे काय ? | **होय.** |
| ४. | अर्जदार हिस पोटगी मिळणेस पात्र आहे काय ? असल्यास किती ? | **अंशतः होय, अर्जदार हिस र.रु.२,०००/– पोटगी मंजूर.** |
| ५. | अर्जदार हिस नुकसानभरपाई मिळणेस पात्र आहे काय ? असलेस किती ? | **अंशतः होय, अर्जदार हिस र.रु. २,०००/– नुकसान भरपाई मंजूर.** |
| ६. | आदेश काय? | **अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.** |

**–::– कारणमिमांसा –::–**

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीता</u>:–**

८. वरील तिन्ही मुद्दे एकमेकांशी संबंधीत असल्याने व एकमेकांवर अवलंबून असल्यामुळे पुराव्यातील पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी तिन्ही मुद्यांचे विवेचन एकत्रित करत आहे.

**९.** अर्जदार हिने तिचे अर्जाचे पुष्ठ्यर्थ स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.५ लगत दाखल केलेले आहे. तसेच अर्जदार हिने मालमत्ता व दायित्व याबाबतचे शपथपत्र निशाणी क्र.६ लगत दाखल केले आहे. अर्जदार हिने पुरावा बंदची पुरशिस निशाणी क्र.७ लगत दाखल केली आहे.

**१०.** अर्जदार हिचे विधिज्ञ श्री. आर.डी.बिले यांनी असा युक्तीवाद केला आहे की, अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दि.१४.०७.२०१४ रोजी झालेला आहे. अर्जदार हिने प्रस्तुत कामामध्ये सामनेवाला यांचेकडून पोटगी मिळण्यासाठी विनंती केलेली आहे. सामनेवाला हे अर्जदार हिचे कोणतेही पालन–पोषण करत नाहीत. सामनेवाला यांनी अर्जदार हिचा स्वतःहून स्विकार करणेस नकार दिलेला आहे. करीता अर्जदारतर्फे विधिज्ञ यांनी अर्जदार हिस सामनेवाला यांचेकडून रक्कम रुपये १०,०००/– दरमहा पोटगी तसेच, प्रस्तुत अर्जाचा खर्च रक्कम रुपये ५,०००/– मिळण्याची विनंती केलेली आहे.

**११.** अर्जदार हिने प्रस्तुतच्या अर्जामध्ये सामनेवाला यांचेकडून रक्कम रुपये १०,०००/– इतकी दरमहा पोटगी तसेच प्रस्तुत अर्जाच्या खर्चाची रक्कम रुपये ५,०००/– मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्यामुळे अर्जदारने केलेल्या मागणी नुसार संबंधीत कायद्यातील तरतुद पाहणे गरजेचे आहे. **भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १४४** चा विचार करता, *"स्वतःचा उदरनिर्वाह करणेस असमर्थ असल्यास पत्नीला अथवा अपत्याला आर्थिक मदत देण्यास न्यायालयाला आदेश पारीत करता येईल."*

**१२.** अर्जदार हिने स्वतःचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र (नि.क्र.५) दाखल करुन मुळ अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. त्यामुळे याठिकाणी मी सदर कथनांची पुनरावृत्ती टाळते. प्रस्तुतकामी सामनेवाला यास पुरेशी संधी देऊन देखील सामनेवाला यांनी अर्जदार हिचे अर्जातील व प्रतिज्ञापत्रातील कथने आपले म्हणणे देऊन अथवा उलटतपास घेऊन नाकारलेले नसल्यामुळे

सदरची अर्जदार हिची कथने विनाआव्हानित राहिलेली आहेत. अर्जदार हिने तिचे सरतपासामध्ये तिचेवर होणाऱ्या घरगुती हिंसाचाराच्या विविध विधानांचे विवेचन केले आहे. तसेच, सामनेवाला यांचेकडून त्यांना होणाऱ्या शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रासाबाबत कथने केली आहेत. यावरुन, अर्जदार ही सामनेवालासोबत न राहण्यास संयुक्तीक कारण असल्याचे अर्जदार हिचे पुराव्यावरुन दिसून येते. अर्जदार हिने तिचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र.१२ मध्ये दि.२२.०३.२०२४ रोजी सामनेवाला याने दारु पिऊन पैशाची मागणी केली व पैसे देण्यास अर्जदार हिने नकार दिल्यामुळे सामनेवाला याने अर्जदार हिला शिवीगाळ तसेच मारहाण करुन घराबाहेर काढले. यावरुन असे दिसून येते की, सामनेवाला यांनी अर्जदार हिचा कोणत्याही कारणांशिवाय त्याग केला आहे. त्यामुळे अर्जदार हिला सामनेवालासोबत न राहण्याचे कारण सबळ आहे.

**१३.** दि.२२.०३.२०२४ पासून अर्जदार ही सामनेवालापासून विभक्त राहत असल्याचे पुराव्यांवरुन दिसून येते. तसेच सदर काळात सामनेवाला यांनी अर्जदार हिच्या पालन–पोषणाची जबाबदारी घेतली, असा कोणताही पुरावा सामनेवालातर्फे अभिलेखावर दाखल नाही. त्यामुळे, सामनेवाला यांनी अर्जदार हिचे उदरनिर्वाहाकडे तसेच तिला अन्न, वस्त्र व इतर मुभलक सुविधा पुरविणेस सामनेवाला यांनी कसुर केल्याचे अर्जदार हिने सिध्द केले आहे.

**१४.** अर्जदार हिने तिचे मालमत्ता संदर्भात प्रतिज्ञापत्र *(As per direction given by the Hon'ble Supreme Court in case of* ***Rajnish v/s Neha****, 2021 (2)* ***SCC decided on*** *4th* ***November*** *2020*) निशाणी क्र.६ लगत मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र दाखल केले आहे. सदर शपथपत्राचे अवलोकन केले असता, अर्जदार हिस कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याने अर्जदार स्वतःचा उदरनिर्वाह करणेस असमर्थ असल्याचे शपथेवर सांगितले आहे. याउलट सामनेवाला याची स्वतःची रिक्षा असून, तो रिक्षा चालक असल्याने

दरमहा रक्कम रुपये ४०,०००/– कमवत असल्याचे शपथेवर सांगितले आहे. सामनेवाला यांनी अर्जदाराच्या अर्जातील व सरतपासातील कथने नाकारलेली नसल्यामुळे सदरची कथने ही सामनेवाला यांना मान्य असल्याचे दिसून येते. अर्जदार हिने सामनेवाला यास दरमहा नेमके किती उत्पन्न मिळते याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे सामनेवाला यास नेमके किती उत्पन्न मिळते याबाबत साशंकता निर्माण होते. अर्जदार ही सामनेवाला यांची पत्नी आहे ही बाब दाखल पुराव्यावरुन स्पष्ट होते. सामनेवाला हा अर्जदार हिचा पती असल्याने अर्जदार हिचे पालन–पोषण करण्याची तसेच योग्य प्रकारे उदरनिर्वाहाची सोय करण्याची जबाबदारी सामनेवाला याची आहे. तसेच पत्नी म्हणून तिच्या प्राथमिक गरजा भागविणे व तिच्या उदरनिर्वाहाची सोय करणे हे पती म्हणून सामनेवाला याचे नैतिक कर्तव्य आहे. सबब, उपरोक्त विवेचनाप्रमाणे सामनेवाला यांचेकडून अर्जदार हिस वाजवी रक्कम मिळणे न्यायोचित ठरेल. सबब, मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर **होकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्र.४ व ५ बाबतः–</u>**

**१५.** मुद्दा क्र.१ ते ३ च्या निष्कर्षाच्या अनुषंगाने, अर्जदार हिस उत्पन्नाचे साधन नसल्याने अर्जदार स्वतःचे पालन–पोषण करण्यास असमर्थ आहे. अर्जदार यांच्या पुराव्यातील शपथपत्रामध्ये परिच्छेद क्र.३ मधील मजकुरानुसार अर्जदार व सामनेवाला यांची मुलगी सान्वी सामनेवाला यांचेसोबत राहत असल्याचे कथन केले आहे. तसेच अर्जदार हिने दाखल केलेल्या मालमत्ता व दायित्वाचे (नि.क्र.६) शपथपत्राचे अवलोकन केले असता, अर्जदार व सामनेवाला यांची मुलगी सान्वी अर्जदार यांचेसोबत राहत असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे अर्जदार व सामनेवाला यांची मुलगी सान्वी सध्या कोणाच्या ताब्यात आहे याबाबत साशंकता निर्माण होत आहे. त्यामुळे चालू राहणीमानाचा विचार करता, अर्जदार हिच्या दैनंदिन उदरनिर्वाहाकरिता व पालन–पोषणाकरीता

अर्जदार हिला सामनेवाला यांचेकडून रक्कम रुपये **२,०००/– (रुपये दोन हजार मात्र)** पोटगी मिळणेस पात्र आहे.

**१६.** अर्जदार हिने प्रस्तुत अर्जाचा खर्च रक्कम रुपये ५,०००/– सामनेवाला यांचेकडून मिळावा अशी विनंती केली आहे. प्रस्तुत अर्जाचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज हा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १४४ अंतर्गत दाखल केल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदार हिस प्रस्तुतकामी कोणतीही न्यायालयीन शुल्क नाही. परंतु, अर्जदार हिस प्रस्तुतकामी न्यायलयीन शुल्क व्यतिरीक्त इतर खर्च आला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अर्जदार हिस अर्जाचा खर्च **रक्कम रुपये २,०००/– (रुपये दोन हजार मात्र)** सामनेवाला यांचेकडून देण्याचा आदेश करणे न्यायोचित होईल. सबब, उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता मी मुद्दा क्र.४ व ५ चे उत्तर **अंशतः होकारार्थी** नोंदवून मुद्दा क्र.६ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहेः–

–::– **आदेश** –::–

**१.** प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करणेत येत आहे.

**२.** सामनेवाला यांनी अर्जदार हिस दरमहा रक्कम रुपये **२,०००/– (रुपये दोन हजार मात्र)** पोटगी अर्ज दाखल तारखेपासून द्यावे.

**३.** सामनेवाला यांनी अर्जदार हिस प्रस्तुत अर्जाचा खर्च रक्कम रुपये **२,०००/– (रुपये दोन हजार मात्र)** देणेचा आहे.

**३.** ज्या मागण्या मान्य नाहीत त्या अमान्य समजण्यात याव्यात.

**४.** सदर आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यांना मोफत देणेत यावी.

सही/–

[ एन.ए.बकरे ]

दिनांकः–१८/०६/२०२६.

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ कुडाळ.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. filed judgment/order are same word to word, as per the original judgment/order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : V.B.Gurav (Grade-3) |
| Court Name | : Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Kudal. |
| Judgment/order signed by the P.O.on | :18-06-2026 |
| Judgment/order uploaded on | :18-06-2026 |